**सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय,**
**शासकीय तंत्र निकेतन परिसर, गाडगे नगर, अमरावती ४४४ ६०३**
E-mail:-roamravati@dtemaharashtra.gov.in Ph.No. :(०७२१) २५७३०२७, २५७२५७७
Website: www.jdroamt.org Fax No. : (0721) 257 7913

ईमेलव्दारे/संकेतस्थळावर क्रमांक :-विकाअ/शिक्षण/ईबीसी/मुल्या/२०१७/1334
दिनांक . 7 JUN 2017

**प्रति,**

**प्राचार्य/संचालक,**
सर्व संबधित व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या शैक्षणिक संस्था
**अमरावती विभाग, अमरावती.**

**विषय :- खाजगी कायम विनाअनुदानित शिक्षण संस्थातील व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेणा-या आथिकदृष्टया मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्काच्या प्रतिपूर्ती योजना शैक्षणिक वर्ष २०१५-१६ पासुन पुढे सुरु ठेवण्याबाबत.**

**संदर्भ :- १) शासन निर्णय उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे पत्र क्रं.टीईएम-२०१५/प्र.क्र.२०१९/तांशि-४ दि.३१.०३.२०१६**
**२)मा.संचालक,तंत्रशिक्षण संचालनालयाचे पत्र क्र.१८/ईबीसी/मुल्या.व दर्जा माना/२०१७-१८/७७ दिनांक ०५/०६/२०१७**

उपरोक्त विषयाचे अनुषगाने आपणास कळविण्यात येते की, राजर्षी छत्रपती शाहु महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना शैक्षणिक वर्ष २०१५-१६ पासुन पुढे सुरु ठेवण्याबाबत संदर्भाधिन शासन निर्णयान्वये शासनाने माण्यता दिली आहे. सदर शासन निर्णयातील अट क्रमांक १८ खालील प्रमाणे आहे:-

" सदर योजनेंतर्गत पात्र असणा-या व्यावसायिक अभ्यासक्रम राबविणा-या संबंधित शैक्षणिक संस्थानी पुढील ३ वर्षाच्या आत म्हणजे शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पर्यंत सक्षम शिखर संस्थेकडुन मूल्यांकन व दर्जा मांनाकन प्राप्त करणे (Assesment Accreditation) आवश्यक राहील. तदनंतर शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासुन संबंधित शिखर संस्थाकडुन मूल्यांकन व दर्जा निश्‍चिती करुन मुल्यांकन प्राप्त न केल्यास अशा संस्थांना मुल्यांकन व दर्जा मानांकन प्राप्त होईपर्यंत या योजनेतुन वगळण्यात येईल व त्या वर्षापासून केवळ मानांकन प्राप्त करणा-या शैक्षणिक संस्थेमध्ये प्रथम वर्षासाठी प्रवेश घेणा-या विद्यार्थ्यांकरीताच सदर योजना लागू राहील."

वरील अटीनुसार सर्व संबधित व्यावसायीक अभ्यासक्रमाच्या शैक्षणिक संस्थांनी सक्षम शिखर संस्थाकडुन मुल्यांकन व दर्जाचे मानांकन शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पर्यंत प्राप्त करुन घेणे गरजेचे आहे, अन्यथा या संस्था शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासुन उपरोक्त शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेपासून वंचित राहतील. आता लवकरच शैक्षणिक वर्ष २०१७-१८ सरु होत आहे. त्यामुळे सर्व शैक्षणिक संस्थांना मुल्यांकन करुन घेण्यासाठी २ वर्षाचा कालावधी शिल्लक राहणार आहे. या २ वर्षाच्या कालावधीत सर्व शिक्षण संस्थांनी मुल्यांकन करुन घेणे गरजेचे आहे, याची जाणीव आपणास करुन देण्यात येत आहे. तसेच आपल्या संस्थामध्ये शिकणा-या सामाजिक मागास व आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना सदर शिक्षण शुल्क प्रतिपूर्तीच्या लाभापासुन वंचित ठेवता येणार नाही. योग्य ती आवश्यक कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावे.

प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
अमरावती

**प्रत:-** १) मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई (कार्या.क्र.१८) यांना माहितीस्तव सादर.